


Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे अंक : २६१ वा शुक्रवार दि. २० डिसेंबर २०२४ पृष्ठ ८ किंमत ३रुपये


# जिल्हा रुग्णालय भ्रष्टाचार प्रकरणातील दोषीवर गुन्हा दाखल

## दैनिक जनसंचलनच्या संपादकांना कंत्राटदार बबलू इनामदार यांनी दिल्या होत्या धमक्या...

जनसंचलन/बुलढाणा

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील भ्रष्टाचारात सामील असलेल्या आणि या भ्रष्टाचारातून बक्कळ पैसे अवैधरित्या खाणाऱ्या एका दोषीविरोधात दैनिक जनसंचलनकडून पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली. या तक्रारीवरून संबंधित दो-षीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंदर्भातील तक्रार दैनिक जनसंचलनचे संपादक जितेंद्र कायस्थ यांनी शहर पोलिस स्टेशनला दिली होती. बुलढाणा शहर पोलिस यासंदर्भात पुढील तपास करीत आहेत.येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात जो काही बेबंद भ्रष्टाचार बोकाळला आहे, त्यासंदर्भात दैनिक जनसंचलन एकीकडे सातत्याने वृत्तमालिका प्रकाशित करून भ्रष्टाचाराला चव्हाट्यावर आणण्याचे काम करीत आहे. दुसरीकडे या भ्रष्टाचारातील दोषींवर कारवाई व्हावी, यासाठी वरिष्ठांकडे पाठपुरावादेखील करीत आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयातील कोव्हिडं १९ काळात मॉड्युलर ऑपरेशन थिएटरचे बांधकाम करण्याची निविदा काढण्यात आली होती. दरम्यान, हे काम ज्या कंत्राटदाराला देण्यात आले, त्याचे नाव बबलू इनामदार असे आहे.खरे तर मॉड्यूलर ओटी काम पूर्ण झाल्यानंतर आणि त्याचा अहवाल आल्यानंतरच संबंधित कंत्राटदारास रक्कम अदा करणे गरजेचे होते. मात्र, हे काम पूर्ण न होताच बबलू इनामदार यांना सर्व नियमडावलून कामाचे बिल अदा करण्यात आले. लाखो रुपयांची बिले ही इनामदार यांना देण्यात आली. या प्रकरणी जिल्हा सामान्य रुग्णालयातील तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक,निलंबित




भांडारपाल व इतर अधिकारी दोषी आहेत.दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने ही सर्व माहिती घेतल्यानंतर त्यासंदर्भात वृत्त प्रकाशित केले. परंतु हे वृत्त प्रकाशित केल्यानंतर सोलापूर येथील कंत्राटदार बबलू इनामदार यांनी सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनचे संपादक जितेंद्र कायस्थ यांना फोन करून या कामाचा मी कंत्राटदार नसल्याचे सांगितले. त्यानंतर कायस्थ यांनी इनामदार यांना कागदोपत्री आमच्याकडे पुरावे असल्याचे सांगितले.जर तुम्ही कंत्राटदार नाही तर मग या कामाची रक्कम तुम्ही कशी घेतली, असा प्रश्न विचारला. त्यानंतर इनामदार यांनी तुम्ही माझ्या बातम्या प्रकाशित करणे बंद करा नाही तर मी स्वतःचे काही बरेवाईट करून घेईल, अशी धमकी दिली.

यानंतर दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजचे संपादक जितेंद्र कायस्थ यांनी शहर पोलिस स्टेशनला यासंदर्भात तक्रार दाखल केली. यानंतर शहर पोलिसांनी भ्रष्टाचारातील दोषी बबलू इनामदार याच्याविरोधात शहर पोलिसांनी कलम ३५१ (४) बीएनएस २०२३ दाखल केले आहे.जिल्हा रुग्णालयात झालेल्या भ्रष्टाचार प्रकरणी दैनिक जनसंचलन सातत्याने वृत्तमालिका प्रकाशित करीतच राहणार आहे. कारण अशाप्रकारे भ्रष्टाचारातून राज्याचे आणि देशाचे नुकसान करणाऱ्यांप्रति दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज कोणीतीही दयामाया दाखवणार नाही. आमची भ्रष्टाचारविरोधातील मोहीम ही अशीच सुरू राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात

# पहुरी शिवारात बिबट्याच्या हल्ल्यात पाच शेळ्या ठार...

जनसंचलन/ सोयगाव

शेतातील गोठ्यात दावणीला असलेल्या शेळ्यावर बिबट्याने हल्ला करुन पाच शेळ्या ठार केल्याची घटना सोयगाव तालुक्यातील पहुरी बु शिवारात गुरुवार (ता १९) सकाळी उघडकीस आली दरम्यान ह्या घटनेत शेतकरी चे जवळपास एक लाख रुपयांचे नुकसान झाले आहे... पहुरी बु.येथील शेतकरी नामदेव रामहरी गव्हाले यांची गट.न.७५ मध्ये तीन एकर जमीन असुन शेतीस जोडधंदा म्हणून त्यांनी शेळी पालन व्यवसाय सुरू केलेला असुन त्याच्याजवळ जवळपास अठरा शेळ्या होत्या त्या शेळ्या शेतातील पत्राच्या गोठ्यात दावणीला बांधुन संध्याकाळी घरी गेले जेव्हा मध्यरात्री बिबट्याने अचानकपणे हल्ला करुन पाच शेळ्या ठार केले तर चार शेळ्या जखमी केलेल्या होत्या गुरुवारी सकाळी शेतकरी शेतात गेल्यावर ही घटना घडलेली निदर्शनास आली याबाबत घटनेची माहिती वनविभागाला देण्यात आली त्यानुसार वनसंरक्षक एफ.जी.मुलताने यांनी घटनेचा पंचनामा केला आहे यावेळी आत्माराम गव्हाले,सागर गोराडे, विश्वनाथ ढवणे, कैलास तेली,हर्षल गव्हाले,प्रमोद गव्हाले,आदी उपस्थित होते गेल्या आठ दिवसापासून पहुरी शिवारात बिबट्याच्या मुक्त संचार वाढला असुन अनेक शेतकरीना



हा बिबट्या दीसला होता गेल्या आठ दीवसापुर्वी शेतकरी रात्रीच्या रब्बी पिकांना देण्यासाठी गेले असता बिबट्याचा मुक्त संचार करताना दीसल्याने शेतकऱ्यांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे तरी वनविभागाने पिंजरा लावुन ह्या बिबट्यास जेरबंद करावे अशी मागणी शेतकरीकडुन होत आहे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राज्यातील ५००० बांधकाम कामगारांचा नागपूर विधानसभेवर लक्षवेधी विराट मोर्चा.

वृत्तसंस्था/ नागपूर



राज्यातील ५००० बांधकाम कामगारांचा नागपूर विधानसभेवर लक्षवेधी विराट मोर्चा. विशेष प्रतिनिधी नागपूर- मोर्चामध्ये महाराष्ट्र शासनाने बांधकाम कामगारांची बंद केलेली पोर्टल पूर्ववत सुरू करा,स्वतः बांधकाम कामगारांना अर्ज दाखल करण्याची पूर्वीप्रमाणेच सुविधा द्या,राज्यातील २६ लाख बांधकाम कामगारांचे प्रलंबित अर्ज एक महिन्यापेक्षा जास्त काळ झाल्याने ते सर्व अर्ज मंजूर झाल्याचे घोषित करा,कामगार संघटनांना सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशानुसार बांधकाम कामगारांचे काम करण्यास परवानगी द्या,माजी कामगार मंत्र्यांनी जाहीर केल्यानुसार राज्यातील ५४ लाख बांधकाम कामगारांना ५००० रुपये सानुग्रह अनुदान त्वरित देण्याची व्यवस्था करा, बांधकाम कामगारांची घरकुल योजना प्रभावीपणे राबवा,बांधकाम कामगारांना पेन्शन द्या,बांधकाम कामगारांना एखाद्या लागू करा इत्यादी घोषणा कामगार जोरदारपणे देत होते. या मोर्चाचे नेतृत्व बांधकाम कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे मुख्य निमंत्रण कॉम्रेड शंकर पुजारी,सहनिमंत्रक सागर तायडे, सर्व सहनिमंत्रक विनिता बाळेकुंद्री, राजकुमार होळीकर,प्रशांत रामटेके,गणेश उके,प्रशांत मेश्राम,आनंद भालेराव, काशिनाथ नखाते,विशाल बडवे,रत्नपाल डोफे,मंगेश माटे आणि नरेंद्र जारोंडे राष्ट्रीय उपाध्यक्ष स्वतंत्र मजदूर युनियन यांची विशेष उपस्थिती होती. त्यांनी मार्गदर्शन केले. बांधकाम कामगार संघटना संयुक्त कृती समितीच्या शिष्टमंडळाच्या वतीने मा.ना.श्री. अतुल सावे मंत्री महाराष्ट्र राज्य यांना निवेदन देण्यात आले. शिष्टमंडळाच्या वतीने मंत्र्यांच्या कडे अशी मागणी करण्यात आली की बांधकाम कामगारास व्यक्तिगत मंडळाकडे नोंदणी करण्यासाठी व लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचा मूलभूत अधिकार आहे तो कायद्यानेच दिलेला असल्यामुळे तो नाकारता येणार नाही जसे आज पासपोर्ट,शॉप ॲक्टची, लायसन्स ड्रायव्हिंग,लायसन्स काढण्यासाठी ऑनलाईन अर्ज घेतले जातात किंबहुना शासन डिजिटल पद्धतीने कारभार करून पाहते त्यामुळे कामगारास ऑनलाइन अर्ज करण्याची सध्या जी बंदी घालण्यात आलेली आहे ती त्वरित उठवण्यात यावी.सर्व प्रलंबित अर्ज त्वरित मंजूर करण्यात यावेत कामगार संघटनांना बांधकाम कामगारांचे काम करण्याबद्दल सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार हक्क मिळावेत.माननीय नामदार श्री.अतुल सावे मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी शिष्टमंडळास सांगितले की, सध्या कामगार मंत्री यांची निवड झालेली नसून लवकरच दोन दिवसांमध्ये होईल त्यानंतर व नागपूर अधिवेशन संपल्यानंतर बांधकाम कामगार संघटना संयुक्त कृती समिती बरोबर कामगार मंत्री यांच्या बरोबर बैठक लावण्यात येईल व प्रश्न सोडवले जातील. असे त्यांनी आश्वासन दिले.या शिष्टमंडळात शंकर पुजारी-सांगली,सागर तायडे मुंबई,विनिता बाळेकुंद्री नवीमुंबई,राजकुमार होळीकर लातूर,प्रशांत रामटेके वर्धा,प्रशांत मेश्राम अकोला,आनंद भालेराव धाराशिव हे होते. यानंतर मोर्चाच्या जाहीर सभेमध्ये असा निर्णय घेण्यात आला की सध्या सर्वोच्च न्यायालयाने आणि राज्य सरकारने सुद्धा आदेश दिलेला असल्यामुळे कामगार संघटनांना बांधकाम कामगारांचे अर्ज दाखल करण्याचा अधिकार आहे. त्यानुसार दोन दिवसांमध्ये प्रत्येक जिल्ह्यात नोंदणी बद्दल व कल्याणकारी लाभ मिळण्याबद्दलच्या याद्या संबंधी जिल्ह्यातील सहाय्यक कामगार आयुक्त यांच्याकडे द्याव्यात त्यांनी जर तसे काम करण्यास नकार दिल्यास त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र राज्याचे कामगार आयुक्त व प्रधान सचिव यांच्याकडे तक्रार करावी.असे ठरवण्यात आले. महाराष्ट्र शासनाने तारीख ९ सप्टेंबर २०१४ रोजी असा आदेश केलेला आहे की बांधकाम कामगारांचे सर्व अर्ज एका महिन्यात निकाली काढावेत परंतु राज्यातील २६ लाख बांधकाम कामगारांचे अर्ज मागील एक वर्षापासून प्रलंबित असल्यामुळे हे सर्व अर्ज मंजूर केल्याचे शासनाने जाहीर करावे व त्याचे आवश्यक तपासणी करावी असेही ठरवण्यात आले.मोर्च्याच्या जाहीर सभेचे सूत्र संचालन गणेश उके सहसचिव स्वतंत्र मजदूर युनियन यांनी केले तर प्रशांत रामटेके यांनी आभार मानले. विशेष चौकट - बिल्डिंग पेंटर बांधकाम व इतर असंघटीत मजूर संघ अकोला अध्यक्ष:- प्रशांत मेश्राम-मोबिन शेख,विनोद जपसारे यांच्या वतीने म्हणजेच कामगारांनी कामगारांसाठी कामगारांच्या मोर्च्यातील कामगारांना फुलाव भाताची विशेष व्यवस्था केली होती.आकोल्यावरून सर्व साहित्य आणून त्यांनी यशवंत स्टेडियम व टेकडी रोडवर सर्व कामगारांना जेवण वाटप केले.

# बुलढाणा जिल्हा कारागृहातील बंद्यांना स्वयंरोजगाराचे धडे...

जनसंचलन/बुलढाणा



कारागृहातुन मुक्त झाल्यानंतर त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहता यावे, या उद्देशाने बुलढाणा जिल्हा कारागृहातील बंद्यांकरीता स्वयंरोजगाराचे धडे देण्यात येत आहे. त्याअनुषंगाने येथील सेंट ग्रामिण प्रशिक्षण संस्थाच्या माध्यमातुन दि. १६ डिसेंबरपासुन सहा दिवसांचे फास्ट फुड उद्यमी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षणाला बंद्यांचा उत्स्फुर्त प्रतिसादपणे सहभागी नोंदविला. बुलढाणा जिल्हा कारागृहामध्ये ३२३ न्यायाधिन बंदी बंदीस्त आहे. या बदीस्त बंद्यांसाठी प्रशिक्षण देण्यात येत असून पहिल्या तुकडीमध्ये ३२ बंद्यांनी उस्फुर्तपणे सहभाग नोंदविला आहे. कोल्हापुर येथील प्रशिक्षक तृप्ती धिंडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण सुरु झालेले आहे. सदर प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थी बंद्यांना संस्थेमार्फत प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तसेच बंद्यांना भविष्यात उपजिवीकेसाठी निश्चितच फायदा होणार आहे. सेंट ग्रामीण प्रशिक्षण संस्था बुलढाणा यांचे मार्फत कारागृहामध्ये बंद्यांकरीता पुढील प्रशिक्षण शिबिरामध्ये नर्सिंग कोर्स, टेलरींग कोर्स, मोटार रिवायडींग असे विविध प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येणार आहेत. या उपक्रमामध्ये अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक प्रशांत बुरडे, कारागृह व सुधार-सेवा, महाराष्ट्र राज्य पुणे व विशेष पोलीस महानिरीक्षक(मुख्यालय) जालिंदर सुपेकर, कारागृह व सुधार-सेवा व कारागृह उपमहानिरीक्षक स्वाती साठे यांचे मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले. सदर कार्यक्रमाचे यशस्वी आयोजनाकरीता कारागृह अधीक्षक संदीप पां. भुतेकर, वरीष्ठ तुरुंगाधिकारी मेघा बाहेकर, सेंट ग्रामीण प्रशिक्षण संस्थाचे संचालक संदीप पोटे, फॅकल्टी स्वनील गवई, श्रीकृष्ण राजगुरे, सहाय्यक प्रशांत उबरहांडे, मनिषा देव तसेच सर्व कारागृह अधिकारी व कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# देऊळगाव महीनजीकच्या त्या दुचाकी अपघातातील महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू




जनसंचलन/ देऊळगाव राजा

अज्ञात वाहनाने धडक दिल्याने दुचाकीवरून पडून गंभीर जखमी झालेल्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याप्रकरणी अज्ञात वाहनचालकाविरोधात देऊळगाव राजा पोलिसांनी १८ डिसेंबर रोजी गुन्हा दाखल केला. ११ डिसेंबर रोजी ही अपघाताची घटना आश्रूबा सखाराम दहीकर यांनी या प्रकरणी देऊळगाव मही पोलिस चौकीत तक्रार दिली. त्यांची पत्नी कल्पना ही दुचाकीवर निमगाव गुरू येथून देऊळगाव राजा येथे जात होती. या दरम्यान एका हॉटेलनजीक अज्ञात वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने त्यात संतुलन जाऊन त्या दुचाकीवरून खाली पडल्या. त्यात त्यांना गंभीर दुखापत झाली होती. रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल कलीम देशमुख हे करीत आहेत.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आरोग्य सेवा सुलभ आणि सक्षम बनविण्याच्या दृष्टिकोनातून उपाय योजना करा

## केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या आरोग्य अधिकाऱ्यांना सूचना



जनसंचलन/बुलढाणा

गोरगरीब जनतेला केंद्रबिंदू माणुन प्रत्येक व्यक्तीला उत्तमातील उत्तम आरोग्य सेवा मिळावी यादृष्टीकोनातून आरोग्य सेवा सुलभ आणि सक्षम बनविण्यासाठी उपाय योजना करण्याच्या सूचना केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार) आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आरोग्य अधिकाऱ्यांना दिल्या. आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या अर्थसंकल्पासंदर्भात १८ डिसेंबर रोजी दिल्ली येथील आरोग्य मंत्रालयाच्या दालनात केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीला आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना ते पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आणि केंद्रीय आरोग्यमंत्री जे पी नड्डा यांच्या मार्गदर्शनाखाली देशातील प्रत्येक नागरिकांना उत्तमातील उत्तम आरोग्यसेवा देण्यासाठी आपले सरकार कटिबद्ध आहे. त्या दृष्टिकोनातून येणाऱ्या अर्थसंकल्पात आरोग्यसेवा अधिक सक्षम करून नागरिकांना सहज आरोग्य सुविधा मिळण्याच्या दृष्टिकोनातून उपाय योजना करा अशी सुचना केली सोबत आरोग्य विषय विविध विषयावर चर्चा करण्यात आली. या बैठकीला आरोग्य विभागाची वरिष्ठ अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# जिल्ह्यात प्रशासन गाँव की ओर मोहीमेला सुरुवात

## कोथळी व खराबडी येथील अपंग लाभार्थ्यांना दिली सेवा



जनसंचलन/ डोणगाव

केंद्र शासनाच्या प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभागाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात १९ ते २४ डिसेंबर दरम्यान सुशासन सप्ताह राबविण्यात येत आहेत. या सप्ताहांतर्गत जिल्ह्यात प्रशासन गाँव की ओरफ मोहीमेला गुरुवार दि. १९ डिसेंबर पासून सुरुवात झाली आहे. मोहिमेंतर्गत मौजे कोथळी व खराबडी येथे अपंग लाभार्थ्यांच्या घरी जाऊन शासकीय योजनाच्या लाभाचे प्रस्ताव तयार करुन घेण्यात आले. तसेच यावेळी संबंधित कर्मचाऱ्यांनी लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनाची माहिती दिली. या सुशासन सप्ताह-प्रशासन गाँव की ओर मोहिमेंतर्गत प्रशासनातील विविध विभागांच्या सेवांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी गावपातळीवर शिबिरांचे आयोजन करुन विविध सेवांचा लाभ दिला जाणार आहे. तसेच लाभार्थ्यांच्या तक्रारीं, अर्जांचा निपटारा करुन सेवांचा लाभ दिला जाणार आहे.

# शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये विविध उपक्रमाचे आयोजन

जनसंचलन/बुलढाणा

चिखली शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये स्कुल कनेक्ट वीक, तंत्रप्रदर्शनी, व अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. ९ ते १३ डिसेंबर दरम्यान स्कुल कनेक्ट वीक साजरा बुलढाणा जिल्ह्यातील चिखली शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे दि.९ ते १३ डिसेंबर २०२४ दरम्यान स्कुल कनेक्ट वीक म्हणून साजरा करण्यात आला. या सप्ता मध्ये चिखली तालुक्यामधील तब्बल ८३ विविध शाळाना प्रत्यक्ष भेटी देऊन विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये उपलब्ध व्यवसाय अभ्यासक्रम, त्यांची उपयुक्ता, रोजगार स्वयंरोजगारची संधी याबाबतची माहिती देण्यात आली. भविष्यात तांत्रिक व्यवसाय मध्ये शिक्षण घेतल्यानंतर तांत्रिक माहितीचा उपयोग कसा होतो याबाबतचे महत्व पटवून देण्यात आले. तंत्रप्रदर्शनीला प्रशिक्षणार्थ्यांचा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिखली येथे दि.१८ डिसेंबर रोजी तंत्रप्रदर्शनी आयोजित करण्यात आले. या तंत्रप्रदर्शनी मध्ये विविध व्यवसायातील प्रशिक्षणार्थी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या तंत्रप्रदर्शनीव्दारे त्यांच्यातील सुप्त गुणाला वाव मिळावा म्हणून विविध शाळेमधील विद्यार्थ्यांना निमंत्रित करुन त्यांना प्रदर्शनीमध्ये तयार करण्यात आलेले विविध प्रकल्प दाखवून त्याबाबतची माहिती देण्यात आली. सदर प्रदर्शनीमध्ये संस्थेतील प्रशिक्षणार्थींनी मोठ्या उत्साहाने भाग घेऊन आपल्या मधील सुप्त गुणांचे प्रदर्शन केले. सदर कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी संस्थेतील प्राचार्य शिल्प निदेशक व कर्मचारी वृंद यांनी योग्य मार्गदर्शन करुन सहकार्य केले. अल्पसंख्यांकहक्कदिवसउत्सहातसाजरा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिखली येथे दि.१८ डिसेंबर २०२४ रोजी अल्पसंख्यांक हक्क दिवस उत्सहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेतील अध्यक्ष व प्राचार्य पी. एन. देशमुख आणि शिक्षक व कर्मचारी वृंद उपस्थित होते. तसेच शिल्प निदेशक एम. व्ही. सोनूने यांनी अल्प संख्याकाचे घटनात्मक अधिकार आणि कायदेशीर हक्का बाबतचे महत्व प्रशिक्षणार्थी यांना मार्गदर्शन केले.

# पत्रकार नितीन फुलझाडे यांना एजेएफसीचा आदर्श पत्रकार पुरस्कार प्रदान...

## नागपूर येथे संपन्न झाले संघटनेचे १९ वे अधिवेशन

जनसंचलन/ चिखली

पत्रकार मित्रांचे पहिले संघटन असलेल्या ऑल जर्नालिस्ट अँड फ्रेंड सर्कल, महाराष्ट्र या संघटनेचे १९ वे राज्य संमेलन नागपूर येथे रविवार,दि. १५ डिसेंबर २०२४ रोजी संपन्न झाले. यावेळी महाराष्ट्रातील १५ मान्यवरांना आदर्श पत्रकार व प्रेरणा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथिल पत्रकार नितीन फुलझाडे यांना आदर्श पत्रकार पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सविस्तर असे की, पत्रकारितेच्या माध्यमातून आपल्या लेखीणीतून समाजाच्या व्यथा मांडून त्या शासनदरबारी पोहचविण्याचे व न्याय मिळवून देण्याचे काम चिखली येथिल पत्रकार नितीन फुलझाडे यांनी विविध वृत्तपत्र व स्वत:च्या वृत्तपत्रातून केले. त्यामुळे त्यांना पूढील कामाची नवप्रेरणा व उत्साह मिळावा




यासाठी ऑल जनालिस्ट ॲन्ड फ्रेडस् सर्कलच्या नागपूर येथिल संम्मेलनात संस्थापक अध्यक्ष यासिन पटेल व केंद्रीय अध्यक्ष गणेश कोळी यांच्या हस्ते आदर्श पत्रकार पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी केंद्रीय सचिव बाळकृष्ण कासार, विश्वस्त अतुल होनकळसे, केंद्रीय खजीनदार सत्यवान विचारे, मुंबई अध्यक्ष इसार सय्यद, वरिष्ठ पत्रकार दिपक नागरे, बुलढाणा जिल्हाध्यक्ष श्याम देशमुख, ज्येष्ठ पत्रकार निलेश पोटे, ज्येष्ठ पत्रकार गणेश गोडसे, जेष्ठ पत्रकार रविंद्र फोलाने, नौशाद शेख अब्बास यांच्यासह एजेएफसी संघटनेचे सर्व सदस्यगण व स्थानिक पत्रकार उपस्थित होते. पत्रकार नितीन फुलझाडे यांना मिळालेल्या पुरस्काराने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# शरद पवारांचे दोन नेते अजित दादांच्या भेटीला, नागपुरात वारं फिरतंय...

जनसंचलन/ लोणार

नागपूर : दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांचे मनोमीलन होण्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात जोर धरत असतानाच आता राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार पक्षाचे नेते एकामागून एक राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भेटीला जाताना दिसत आहेत. शशिकांत शिंदे यांनी नागपुरातील उपमुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थान विजयगड येथे जाऊन दादांची भेट घेतल्याचा प्रकार ताजा असतानाच, अवघ्या दोनच दिवसात शरद पवार गटाचे आणखी दोन नेते अजित पवार यांच्या भेटीला गेले आहेत. दिवंगत नेते आर आर आबा यांचे सुपुत्र आणि पवार गटाचे युवा आमदार रोहित आरआर पाटील, तसेच माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचे सुपुत्र सलील देशमुख यांनी अजित पवार यांची भेट घेतली. योगायोगाने रोहित आणि सलील हे दोघेही माजी गृहमंत्र्यांचे लेक आहेत. नागपुरात सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने अजित पवार शहरात आहेत. शुक्रवारी सकाळी आठ वाजताच्या सुमारासच या भेटीगाठी घडल्या. रोहित पाटील आणि सलील देशमुख वेगवेगळे गेले असले, तरी ही भेट एकत्रित झाली का, हे समजू शकलेले नाही. मात्र पवार गटाचे नेते एकामागून एक अजित पवारांची भेट घेत असल्याने राजकीय वर्तुळाच्या भुवया उंचावल्या आहेत. यापैकी रोहित पाटील हे सांगली जिल्ह्यातील तासगाव-कवठे महांकाळ विधानसभा मतदारसंघातून भाजप उमेदवार संजयकाका पाटील यांना पराभवाची धूळ चारुन विजयी झाले. अधिवेशनाच्या निमित्ताने ते नागपुरात आहेत. आबा आणि दादा यांच्यातील मैत्र सर्वश्रुत आहे. एकसंघ राष्ट्रवादीत असताना रोहित पाटलांची अजितदादांसोबत असलेली जवळीक फुटीनंतर कमी झाली होती. त्यातच, नजीकच्या काळात अजित पवारांनी फाईलीबाबत आबांवर केलेल्या आरोपांनंतर दोन कुटुंबांत कटुता वाढल्याचं चित्र होतं. मात्र आता सारे दुरावे विरल्याचे दिसते.



दुसरीकडे, सलील देशमुख यांना शरद पवारांनी नागपूर जिल्ह्यातील काटोल विधानसभा मतदारसंघातून अनिल देशमुख यांच्या जागी उमेदवारी दिली होती. मात्र सलील यांना वडिलांचा गड राखता आला नाही. निवडणुकीच्या तोंडावर अनिल देशमुखांवर झालेल्या हल्ल्याने वातावरण तापलेही होते. परंतु काटोलवर भाजपच्या चरणसिंग ठाकूर यांनी झेंडा फडकवला. सलील देशमुख पराभूत झाले असले, तरी अजितदादा नागपुरात आल्याने मतदारसंघातील कामांचे कारण सांगत त्यांनी भेट घेतली. या भेटींचे नेमके कारण अजून गुलदस्त्यातच आहे.

# उर्दू हायस्कूल जूनियर कॉलेज बुलढाणा येथे भव्य विज्ञान प्रदर्शनी...

## विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रोजेक्ट विज्ञान प्रदर्शनी मध्ये मांडले

जनसंचलन/बुलढाणा

हे युग आता तंत्रज्ञान विज्ञानाचा झालेले आहे. विज्ञानामुळे जगातला कानाकोपऱ्यातला माहिती आता तंतोतंत मिळते. दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा आज दि १९ डिसेंबर रोजी उर्दू हायस्कूल ज्युनिअर कॉलेज बुलढाणा येथे भव्य विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शनी मध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी आपापल्या पद्धतीने आपले प्रोजेक्ट तयार केले आणि ते या विज्ञान प्रदर्शनी मध्ये सर्वांसमोर मांडले आहे. या विज्ञान प्रदर्शनी मध्ये वर्ग ५ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला आहे. या विज्ञान प्रदर्शनीचे उद्घाटन शाळेचे अध्यक्ष मुख्याध्यापक अ रहीम सेठ यांच्या हस्ते करण्यात आले आहे. शाळेचे मुख्याध्यापक यांनी आपल्या भाषणांमध्ये विज्ञानाचे महत्त्व काय असते याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. या कार्यक्रमाचे संचालक दाऊद सर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री जाकीर सर यांनी केले आहे. यावेळी उर्दू एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अ रहीम सेठ, सचिव



सय्यद यासीन, सदस्य जाकिरिया सेठ,अ हमीद सेठ,मो सामीर सेठ, उपमुख्याध्यापक दाऊद सर, पर्यवेक्षक यासीर सर, शिक्षक व कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने या विज्ञान प्रदर्शनीला उपस्थित होते.

# घाटबोरी वनपरिक्षेत्रात सागाच्या लाकडाची चोरी

जनसंचलन/मेहकर

घाटबोरी वनपरीक्षेत्रात रात्र गस्ती दरम्यान १८ डिसेंबर रोजी वन कर्मचाऱ्यांना सागाच्या झाडांची तोड कडून लाकडाची तस्करी करतांना काही जण आढळून आले. त्यांना ताब्यात घेत न्यायालयता हजर केले असता न्यायालयाने त्यांना गुरुवारी एक दिवसाची वन कोठडी सुनावली आहे. घाटबोरी वनपरीक्षेत्रातील वन कर्मचारी हे रात्री ११ वाजेच्या सुमारास राखीव कक्ष क्रमांक १७८ मध्ये गस्तीवर होते. तेथे ५ ते ६ लोक अवैधरित्या प्रवेश करून सागाच्या झाडाची तोड करत असल्याचे निदर्शनास आले. गस्ती पथकाने त्यांचा पाठलाग करून त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला; मात्र आधाराचा फायदा घेत आरोपी पसार झाले; मात्र एक जण या पथकाच्या हाती लागला. त्याच्याकडून सागाची पाच नग जप्त करम्यात आले. त्याची सविस्तर चौकशी केली असता त्याने त्याच्या साथीदारांची नावे सांगितले. आरोपी संदेश अंभोरे, अजय चकेवार, संजय राठोड, प्रमोद रांम्हाळे, संदीप गोटे, किशोर अंभोरे या आरोपींना अटक करण्यात आली. त्यांना मेहकर येथील न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना १९ डिसेंबर रोजी एक दिवसाची वन कोठडी सुनावली. ही कारवाई उप वनसंरक्षक सरोज गवस, सहाय्यक वनससंरक्षक वैभव काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरीक्षेत्र अधिकारी अंकुश येवले व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली. या प्रकरणाचा पुढील तपास वनपाल उषा जाधव या करीत आहेत.

# सुरत येथील भंगार व्यावसायिकांना साडेआठ लाखांनी गंडविले

जनसंचलन/जळगाव जा.

सुरत येथील बंगार खरेदी-विक्री करणाऱ्या व्यावसायिकांना भंगार माल न देता आणि न दाखविता तब्बल साडेआठ लाख रुपयांनी गंडविल्याची घटना १८ डिसेंबर रोजी जळगाव जामोद तालुक्यातील आदिवासी ग्राम हनवतखेड येथे घडली. यासंदर्भात गुरुवारी जळगाव जामोद पोलिस स्टेशनला तक्रार दाखल करण्यात आली. याप्रकरणी चिरागभाई सावजीभाई रानपरीया (३७, रा. कामरेजगाम, जि. सुरत (गुजरात) यांनी फसवणूक झाल्याची तक्रार दिली. त्यानुसार ते मित्रासह भंगार माल घेण्यासाठी आले. त्यावेळी आरोपींनी त्यांना भंगार माल न देता आणि न दाखवता फसवणूक झालेली मालमत्ता, नगदी २७ हजार ५०० रुपये आणि बँक खात्यामधून ६ लाख ८९ हजार रुपये ऑनलाइन रक्कम, असे एकूण ८ लाख ४८ हजार ७०० रुपय घेऊन त्यांची फसवणूक केली.भंगार व्यावसायिक आणि आरोपी यांच्यामध्ये भ्रमणध्वनीवरून स्क्रैप भंगार असल्याची चर्चा तीन-चार दिवसांपासून सुरू होती. त्यामध्येच त्यांची विक्रीबाबत निश्चिती झाली. त्यानुसार आरोपींनी त्यांना महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशाच्या सीमेजवळ आदिवासी ग्राम रायपूरच्याही पुढे जंगलामध्ये छोट्याशा वस्तीजवळ बोलावले.

पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार
City न्यूज बुलडाणा
सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001